लोकमत

# कुलगुरुपदाच्या इच्छुकांच्या छाननीकडे नजरा

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : नागपूर विद्यापीठाच्या कुलगुरु पदासाठी शॉर्टलिस्ट झालेल्या पाच उमेदवारांच्या मुलाखती आज, शुक्रवारी होणार आहेत. त्या पार्श्वभूमीवर शिवाजी विद्यापीठाच्या कुलगुरु पदासाठी इच्छुक असणाऱ्यांच्या नजरा अर्जांच्या छाननीच्या प्रक्रियेकडे लागल्या आहेत.

गेल्या दोन महिन्यांपासून कुलगुरु शोध समितीकडून प्रक्रिया सुरु झाली आहे. त्यासाठी विद्यापीठ कार्यक्षेत्रासह राज्यभरातून १६९ इच्छुकांनी अर्ज केले आहेत. त्यात कुलसचिव, माजी प्र-कुलगुरु, प्राचार्य, काही शैक्षणिक संस्थांचे अध्यक्ष, सचिव, प्राध्यापकांचा समावेश आहे. विद्यापीठाच्या इतिहासात यावेळी पहिल्यांदाच इतक्या संख्येने अर्ज दाखल झाले आहेत. अर्ज करण्याची मुदत संपल्यानंतर शिवाजी विद्यापीठ शिक्षक संघाने अर्ज केलेल्या विद्यापीठातील पाचजणांचा कुलगुरु पदासाठी विचार करु नये, असे पत्र हे शोध समितीला पाठविल्याने खळबळ उडाली. त्यामुळे अर्ज केलेल्या इच्छुकांच्या छाननी प्रक्रियेच्या पूर्णत्वाकडे नजरा लागल्या आहेत. दरम्यान, याबाबत शोध समितीचे संपर्क अधिकारी आर. के. जैन यांच्याशी संपर्क साधला असता, त्यांनी छाननीची प्रक्रिया सुरु असल्याचे सांगितले.

Kolhapur Main
Page No. 2 Aug 07, 2020
Powered by: erelego.com

लोकमत

# गुरव यांच्याकडे परीक्षा संचालकांचा कार्यभार सोपवला

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या परीक्षा व मूल्यमापन मंडळाच्या संचालकपदाचा तात्पुरता कार्यभार डॉ. आर. व्ही. गुरव यांच्याकडे गुरुवारी सोपविण्यात आला आहे. त्याबाबतचे पत्र त्यांना प्रभारी कुलगुरु डॉ. नितीन करमळकर यांनी दिले.

परीक्षा मंडळाचे प्रभारी संचालक जी. आर. पळसे हे दि. २१ जुलै ते १२ ऑगस्टपर्यंत वैद्यकीय रजेवर आहेत. त्यामुळे त्यांच्या पदाचा तात्पुरता कार्यभार विद्यापीठ प्रशासनाने डॉ. गुरव यांच्याकडे सोपविला आहे. ते सध्या विद्यापीठ विकास मंडळाच्या संचालकपदी कार्यरत आहेत. दरम्यान, या पदाचा कार्यभार शासन नियमानुसार विद्यापीठाने उपकुलसचिवांकडे देणे आवश्यक आहे. त्यानुसार कार्यवाही व्हावी, या मागणीचे पत्र विद्यापीठ कर्मचारी संघाच्या वतीने संस्थापक-अध्यक्ष वसंतराव मगदूम यांनी डॉ. करमळकर यांना दिले आहे.

Kolhapur Main
Page No. 2 Aug 07, 2020
Powered by: erelego.com